सद्रक्षणाय खलनिग्रहणाय्
दूरध्वनी क्र. ०२२-२२६२०३३२
Email:pressroom.mum@mahapolice.gov.in

महाराष्ट्र शासन
**पोलीस विभाग**
वार्ताहर कक्ष
पोलीस आयुक्त यांचे कार्यालय,
डॉ. डी.एन. रोड, मुंबई-४००००१

जा.क्र. १६६/ वार्ता.कक्ष /२०२२ दिनांक : ०१/ ०८ / २०२२

# -: प्रेसनोट :-

## समतानगर पोलीस ठाणे - खुनाचा प्रयत्न

दि. ३१/०७/२०२२ रोजी दुपारी ०४.०० वाजताच्या सुमारास यातील दोन अटक आरोपींनी तीन वर्षापुर्वी ज्या इसम नामे इसम विजय पारे यांचा खून केलेला होता यांचा मुलगा नामे भावेश पारे, वय १८ वर्षे यांचेसोबत फिर्यादी राहतात. त्याचा राग मनात धरून, फिर्यादी व भावेश पारे हे दुचाकीवरुन जात असताना बाजीप्रभु चाळ, आंबेडकर रोड, रघुवीर शाळा, कांदीवली पुर्व, मुंबई याठिकाणी यातील अटक आरोपीतांनी त्यांचा रस्ता अडवुन जबरदस्तीने दुचाकीची चावी काढुन त्यांना शिवीगाळ करुन जिवे मारण्याची दमदाटी करुन बाजुला पडलेले दगड फिर्यादीची यामाहा कंपनीची दुचाकी क्र. एम.एच. ४७ ए झेड ७२१२ हिच्यावर टाकुन तिचे नुकसान केले व फिर्यादींना हाताने व लाथाबुक्यांनी मारहाण केली. तसेच अटक आरोपी क्र. १ याने फिर्यांदीच्या छातीवर बसून जीवे ठार मारण्याच्या उद्देषाने त्याचा गळा आवळला व अटक आरोपी क्र. २ हयाने फिर्यादींना जीवे ठार मारण्याच्या उद्देषाने त्याच्या हातातील लोखंडी चॉपरने फिर्यादीवर वार केला. म्हणुन फिर्यादी श्री. आकाश दादु पवार, वय २२ वर्षे, धंदा नोकरी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन गु.र.क्र. १०४१/२२, कलम ३०७, ३४१, ५०६(२), ३२३,४२७, ५०४, ५०६, ३४ भा.द.वि. सह कलम ३७(१)(अ), १३५ म.पो.का. सह कलम ७ क्रिमीनल अमेडमेंट ऍक्ट १९३२ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.